नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २२९ Issue - 229 | वार गुरुवार दि. ८ जानेवारी २०२६ Blow- Thursday Date 8 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# नाशिकमध्ये अपघातात चौघांचा जागीच मृत्यू

## जखमींवर नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिक पेठ राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर चार जण जखमी झाले आहेत. स्कॉर्पिओ आणि ईरटीका कारची समोरासमोर जोरदार धडक झाली आहे. यामध्ये शहारुख फराकत यांच्यासह गुजरातचे रहिवाशी असलेलेल चौघे जण जागीच ठार झाले आहेत. नाशिकच्या पेठ राष्ट्रीय महामार्गावर दुपारी चाचडगाव परिसरात हा अपघात घडला आहे. या अपघातात नेमकी चूक कोणाची याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र. दोन्ही कारची समोरासमोर धडक झआल्यानं चार जणांचा मृत्यू झाला आहे.

या अपघातात किसान गुजर, गणेश, खुशी आणि पूनम गुजर राजस्थान हे चौघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघातग्रस्त गुजरात आणि राजस्थान येथील असल्याची माहिती दिंडोरी पोलिसांकडून देण्यात आली आहे. अपघातग्रस्तांची आेळख पटवत अधिकचा तपास पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे. अपघात झालेली कार ही स्कॉर्पिओ आणि ईरटीका होती. या दोन्ही कारची समोरासमोर धडक झाल्यानं हा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये नेमकी चूक कोणाची आहे याची माहिती मिळालेली नाही. मात्र, या भीषण अपघातात चार जणांचा जीव गेला आहे.



दौंड-पाटस रस्त्यावरील जगदंब हॉटेलमध्ये गॅसचा भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण स्फोटात हॉटेल मधील १० कामगार गंभीर भाजल्याची माहिती मिळत आहे. या जखमी १० कामगारांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. या अपघातात जखमी झालेल्या १० जणांपैकी यातील ६ कामगार गंभीर आहेत. या ६ जणांना पुण्यातील ससून रुग्णालयात तातडीने हलवण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. ज्या जगदंबा हॉटेलमध्ये गॅसचा भीषण स्फोट झाला त्याचा सीसीटीव्ही देखली समोर आला आहे. दुपारच्या दरम्यान कामगार काम करत असताना अचानक गॅसचा स्फोट झाल्याने हॉटेलमधील कामगार होरपळले आहेत. दरम्यान, नेमका अचानक स्फोट कसा झाला? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. दरम्यान, या स्फोटाचा व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये हा भीषण स्फोट असल्याचे दिसत आहे.

# चांदीच्या आयातीत भारत ठरला सर्वात मोठा देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मागील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये भारतातील चांदीच्या किंमतीत जवळजवळ तिप्पट वाढ झाली आहे. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (ऋढठख) च्या अहवालानुसार, औद्योगिक मागणीत वाढ, जागतिक भू-राजकीय तणाव आणि पुरवठ्याशी संबंधित अनिश्चितता यामुळे चांदीला धोरणात्मक धातू म्हणून आणखी महत्त्व आले आहे. भारत सध्या रिफाइंड चांदीचा जगातील सर्वात मोठा आयातदार आहे. २०२५ मध्ये, देशाने सुमारे ९.२ अब्ज डॉलर किमतीची चांदी आयात केली आहे. किंमतीत लक्षणीय वाढ होऊनही, भारताची चांदीची आयात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४४ टक्के जास्त राहिली आहे

**वर्षभरात चांदीच्या किंमतीत तिप्पट वाढ, ८० हजारावर असणारा दर अडीच लाखांच्या जवळ**

मिळालेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ मध्ये चांदीची किंमत सुमारे ८० हजार ते ८५००० प्रति किलोग्रॅम होती, तर जानेवारी २०२६ मध्ये ती सुमारे २.४३ लाख प्रति किलोग्रॅम झाली आहे. ऋढठख च्या मते, ही तीव्र वाढ केवळ भू-राजकीय तणाव किंवा व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्लयासारख्या घटनांमुळे नाही तर जागतिक मागणीच्या रचनेत जलद बदल झाल्यामुळे देखील आहे. सध्या दिवसेंदिवस सोन्या चांदीच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

औद्योगिक वापर हा प्रमुख घटक

आज, जगातील ५० टक्क्यांहून अधिक चांदी औद्योगिक क्षेत्रात वापरली जाते, प्रामुख्याने: इलेक्ट्रॉनिक्स, सौर ऊर्जा, विद्युत वाहने (एती), संरक्षण आणि शस्त्रे प्रणाली, आणि वैद्यकीय तंत्रज्ञान. अहवालानुसार, जागतिक चांदीच्या मागणीपैकी सुमारे १५ टक्के सौर ऊर्जा क्षेत्राचा वाटा आहे, जे त्याचे वाढते औद्योगिक महत्त्व दर्शवते

२००० पासून शुद्ध चांदीची जागतिक मागणी जवळजवळ आठ पटीने वाढली आहे. हे स्पष्टपणे दर्शवते की चांदी आता केवळ पारंपारिक मौल्यवान धातू राहिलेली नाही तर आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाची इनपुट बनली आहे. पुरवठा या वाढत्या मागणीशी जुळवून घेत नाही. चीन या क्षेत्रात वर्चस्व गाजवत आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा चांदी निर्यातदार असला तरी, भारत त्याचा सर्वात मोठा आयातदार राहिला आहे. चीनने चांदी निर्यातीसाठी परवाना अनिवार्य केल्यावर भारताच्या चिंता आणखी वाढल्या आहेत. १ जानेवारीपासून लागू झालेल्या या नवीन नियमानुसार प्रत्येक निर्यात शिपमेंटसाठी चीन सरकारची परवानगी आवश्यक आहे. तज्ञांचा असा विश्वास आहे की या निर्णयामुळे जागतिक चांदी पुरवठा साखळीवर दबाव वाढू शकतो, ज्यामुळे किमतीत आणखी चढ-उतार होऊ शकतात.

# रशियन तेल टँकरवर यूएस नौदलाचा कब्जा; समुद्रात हायव्होल्टेज ड्रामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन: अमेरिका आणि रशिया यांच्यातील तणाव आता धोकादायक वळणावर पोहोचला आहे. उत्तर अटलांटिक महासागरात अनेक आठवड्यांपासून हालव्होल्टेज ड्रामा सुरु असताना अमेरिकेनं रशियाच्या तेल टँकर वर कब्जा केला आहे. मरीनेरा तेल टँकर आता अमेरिकेच्या ताब्यात आहे. या कारवाईनं जगभरात खळबळ उडाली आहे. या ऑपरेशन दरम्यान रशियन नौदलाच्या युद्धनौका आणि पाणबुड्या त्याच परिसरात हजर होत्या.

यासोबतच कॅरेबियन समुद्रातही व्हेनेझुएलाहून येणाऱ्या एका तेल टँकरलादेखील अमेरिकेच्या तटरक्षक दलानं पकडलं आहे. अमेरिकेचे होमलँड सुरक्षा सचिन क्रिस्टी नोएम यांनी दोन्ही ठिकाणची ऑपरेशन यशस्वी झाल्याचं सांगितलं आहे. अवैध व्यापारात सहभाग असलेल्या जहाजांविरोधात कारवाई केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

सचिव क्रिस्टी नोएम यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेच्या सुरक्षा दलानं पहाटेच्या सुमारास दोन ऑपरेशन हाती घेतली. पहिला टँकर 'मोटर टँकर बेला-१' उत्तर अटलांटिकमध्ये पकडला गेला. तर दुसरा टँकर 'मोटर टँकर सोफिया' कॅरेबियन समुद्रात पकडला गेला. आंतरराष्ट्रीय सागर क्षेत्रात ही जप्तीची कारवाई करण्यात आली. दोन्ही जहाजं नुकतीच व्हेनेझुएलात उभी होती किंवा निर्बंध लादण्यात आलेलं खनिज तेल घेऊन त्या दिशेनं जात होती.याआधी अमेरिकन युरोपियन कमांडनं बुधवारी व्हेनेझुएलाच्या तेल व्यापाराशी संबंधित रशियन टँकर मरीनेरावर अमेरिकेनं सैन्य आणि तटरक्षक दलानं संयुक्त ऑपरेशन करत आपल्या ताब्यात घेतल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

# फडणवीसांच्या इशाऱ्यानंतर भाजप-एमआयएम युती तुटली; आमदाराला नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला : राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी युती आणि आघाडी अंबरनाथ नगरपालिका आणि अकोल नगरपालिकेत झाली होती. मात्र, याबाबत वरिष्ठांना समजताच भाजप आणि काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठांकडून कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे, संबंधित स्थानिक नेत्यांकडून ही युती मागे घेतली जात असल्याचंही पाहायला मिळालं. अकोला जिल्ह्यात भाजप आणि एमआयएम (चखच्) यांच्यात युती झाली होती. मात्र, आता एमआयएम अकोटमधील (ज्ञेश्रर) भाजपच्या नेतृत्वाखालील 'अकोट विकास मंचा'तून बाहेर पडले आहे. तर, भाजप (इगझ) प्रदेशाध्यक्षांकडूनही विधानसभा आमदार प्रकाश भरसाखळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर, अंबरनाथमधील भाजप नेते नरेंद्र पवार यांनी ही युती नसून काँग्रेसने भाजपला विकासासाठी समर्थन दिले आहे, तरीही पक्षाचा आदेश आम्हाला मान्य आहे, असे स्पष्टीकरण दिलं. स्थानिक आघाडीतून बाहेर पडत असल्याचे एमआयएमचे पत्र 'एबीपी माझा'च्या हाती आले असू पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष युसूफ पुंजांनींनी हे पत्र दिले आहे. त्यानुसार, एमआयएमच्या अकोट नगरपालिकेतील पाचही नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी भाजपसमवेतच्या आघाडीतून बाहेर पडत असल्याचे पत्र दिले. अकोट नगरपालिकेत हिंदुत्वाच्या बाता करणाऱ्या भाजपची 'एमआयएम'शी आघाडी झाली होती. नगरपालिकेत बहुमत नसलेल्या भाजपने ५ नगरसेवक असलेल्या 'एमआयएम'ला घेतले सोबत होते. मात्र, भाजप नेते तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ही युती मान्य नसल्याचे सांगत कारवाईचा इशारा दिला होता. त्यानुसार, भाजपकडून कारवाईला सुरुवात झाली आहे. आता, एमआयएम'नेही भाजपला दिलेलं समर्थन मागे घेतले. भाजपने स्थापन केलेल्या 'अकोट विकास मंचा'त एमआयएम दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी आणि बच्चू कडूंची 'प्रहार जनशक्ती पार्टी सहभागी झाली होती. मात्र, आता या युतीमधून एमआयएम बाहेर पडलं आहे.

भाजपकडून कारणे दाखवा नोटीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून काँग्रेस आणि एमआयएम समवेत झालेल्या युतीवरुन कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर, अकोट येथील एमआयएमच्या युतीच्या संदर्भात भाजपा प्रदेशाध्यक्षांनी कडक पाऊल उचलले आहे. येथील विधानसभा आमदार प्रकाश भरसाखळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. 'पक्षाची प्रतिमा मलिन झाली, आपल्यावर कारवाई का करण्यात येऊ नये?' असे भाजप प्रदेशाध्यक्षांनी पत्रातून विचारले आहे. त्यामुळे, आता भाजप नेते यावर काय खुलासा देणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**खरातवाडी वनपरिक्षेत्रातील घटना**

**प्रसंगावधानामुळे अधिकारी सुखरूप, आरोपींवर गुन्हा दाखल**

# अवैध मुरूम तस्करांचा महिला वन अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर वनपरिक्षेत्रातील मौजे खरातवाडी (गट नं. २८०) येथे दि. ६ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास शासकीय कर्तव्य बजावत असताना वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) श्रीमती शितल बालाजी चाटे यांच्यावर मुरूम माफियांकडून अंगावर टिपर घालून प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. चाटे यांनी वेळेत बाजुला उडी मारल्याने त्या बचावल्या आहेत. करकंब पोलीस ठाण्यात या प्रकरणी चार आरोपीवर भारतीय न्याय संहिताच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती शितल चाटे, वनपाल बापूराव शंकरराव भोई हे गस्तीवर होते. तेव्हा त्यांना खरातवाडी वनक्षेत्रातून ३ टिपर अवैध गौण खनिज (मुरूम) भरून जाताना आढळले. यातील एका टिपरचा क्रमांक (एमएच-१६-एवाय ६८१६) होता. तर दोन टिपर विना-नंबर प्लेट होते. श्रीमती चाटे यांनी सदर वाहने

**या प्रकरणी वनविभागामार्फत वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.वन अधिकारी आणि कर्मचारी आपले कर्तव्य बजावताना अशा हल्यांना भीक घालणार नाहीत. अवैध व्यवसायांवर कडक कारवाई सुरूच राहील, असा संदेश वन विभागाने दिला आहे.**

थांबवून, मी वनपरिक्षेत्र अधिकारी आहे असे स्पष्ट सांगून वाहनचालकास स्वतःचा परिचय करून दिला. तसेच वाहन चालकांकडे परवान्याची मागणी केली. तेव्हा त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. या वाहनांमध्ये अवैध मुरूम असल्याचे निष्पन्न झाल्याने, ती जप्त करून वन कार्यालयात नेण्याचे आदेश देण्यात आले. वाहने जप्त करून नेत असताना, आरोपी सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा. व्होळे ता. पंढरपूर) याने बनाव करून टिपर थांबवला. अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्याने वनविभाग तुमच्या बापाचा नाही अशा अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्याचवेळी, तोंडाला रुमाल बांधलेला एक अनोळखी इसम तिथे आला. श्रीमती चाटे यांनी त्यालाही आपली ओळख पत्र दाखवून परिचय दिला. तरीही त्याने वाद घालत श्रीमती चाटे यांचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. तर अनोळखी इसमाने गाडी चालू केली. श्रीमती चाटे यांनी गाडी न हलवण्याबाबत कायदेशीर समज दिली. तरी देखील आरोपीने तुम्ही बाजूला व्हा, नाहीतर मी टिपर तुमच्या अंगावर घालीन अशी उघड धमकी दिली. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याने मुरूमाने भरलेला भरधाव टिपर श्रीमती चाटे यांच्या अंगावर घातला. यावेळी श्रीमती चाटे यांनी प्रसंगावधान राखून बाजूला उडी घेतल्याने त्या या भीषण हल्यातून थोडक्यात बचावल्या. सुदैवाने त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही, मात्र आरोपींनी शासकीय जप्तीतील वाहने घेऊन पळ काढला.


### यांच्यावर कारवाई

**या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती शितल चाटे यांच्या फिर्यादीवरून करकंब पोलीस ठाण्यात सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा. व्होळे, ता. पंढरपूर), चंद्रकांत बाळासाहेब घोडके (रा. व्होळे, ता. पंढरपूर) आणि दोन अनोळखी इसम यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड हे करीत आहेत.**

# विलासराव देशमुख यांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील, असे वक्तव्य करुन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रचंड वाद आणि नाराजी ओढावून घेतली होती. रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेस पक्षाने त्यांच्याविरोधात टीकेची झोड उठवली होती. सर्वपक्षीय राजकारण्यांशी सलोख्याने वागणाऱ्या विलासराव देशमुख यांच्याबाबत रवींद्र चव्हाणांची भाषा महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाला फारशी पसंत पडली नव्हती. त्यामुळे या सगळ्याचे पडसाद लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमटण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी लातूरमध्ये झालेल्या सभेत या सगळ्या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. विलासराव देशमुख यांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. त्यामुळे मला त्यांच्याविषयी नितांत आदर आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.



लातूर ही एक अशी भूमी आहे की, जिने महाराष्ट्राला खूप मोठ्याप्रमाणावर नेतृत्व दिले. यामध्ये चाकूरकर साहेबांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यात नगराध्यक्षपदापासून ते लोकसभा अध्यक्ष, देशाचा गृहमंत्री असा प्रवेश केला. राजकारणात अशाप्रकारचे लोक आपल्याला विरळ दिसतात. त्याचप्रमाणे शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब असतील किंवा ज्यांनी या लातूरला एक वेगळी ओळख असतील ते माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख असतील. खऱ्या अर्थाने विलासरावजी देशमुख हे एक असे नाव आहे, जे पक्षाच्या पलीकडे जाऊन या महाराष्ट्राच्या जडघडणीत मोलाचा वाटा आहे म्हणून आपण त्यांचा आदर करतो. हे सांगताना माझ्या मनात कुठलाही संकोच नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

दोन दिवसांपूर्वी याठिकाणी काही संभ्रम निर्माण झाला, गोंधळ झाला. आमचे अध्यक्ष याठिकाणी आले होते. त्यांना बोलायचं होतं, राजकीयदृष्ट्या आपल्याला नवीन रेकॉर्ड तयार करायचाय. पण कदाचित त्यांचे शब्द चुकीच्या पद्धतीने गेले असतील, याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. पण मी जाहीरपणे सांगतो, आमची लढाई काँग्रेस पक्षाशी असली तरी विलासराव देशमुखांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. ते या महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे नेते होते, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## संपादकीय....

### हायव्होल्टेज ड्रामा

अमेरिका आणि रशिया यांच्यातील तणाव आता धोकादायक वळणावर पोहोचला आहे. उत्तर अटलांटिक महासागरात अनेक आठवड्यांपासून हालव्होल्टेज ड्रामा सुरु असताना अमेरिकेनं रशियाच्या तेल टँकर वर कब्जा केला आहे. मरीनेरा तेल टँकर आता अमेरिकेच्या ताब्यात आहे. या कारवाईनं जगभरात खळबळ उडाली आहे. या ऑपरेशन दरम्यान रशियन नौदलाच्या युद्धनौका आणि पाणबुड्या त्याच परिसरात हजर होत्या. यासोबतच कॅरेबियन समुद्रातही व्हेनेझुएलाहून येणाऱ्या एका तेल टँकरलादेखील अमेरिकेच्या तटरक्षक दलानं पकडलं आहे. अमेरिकेचे होमलँड सुरक्षा सचिन क्रिस्टी नोएम यांनी दोन्ही ठिकाणची ऑपरेशन यशस्वी झाल्याचं सांगितलं आहे. अवैध व्यापारात सहभाग असलेल्या जहाजांविरोधात कारवाई केल्याचा दावा त्यांनी केला आहे. सचिव क्रिस्टी नोएम यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेच्या सुरक्षा दलानं पहाटेच्या सुमारास दोन ऑपरेशन हाती घेतली. पहिला टँकर 'मोटर टँकर बेला-१' उत्तर अटलांटिकमध्ये पकडला गेला. तर दुसरा टँकर 'मोटर टँकर सोफिया' कॅरेबियन समुद्रात पकडला गेला. आंतरराष्ट्रीय सागर क्षेत्रात ही जप्तीची कारवाई करण्यात आली. दोन्ही जहाजं नुकतीच व्हेनेझुएलात उभी होती किंवा निर्बंध लादण्यात आलेलं खनिज तेल घेऊन त्या दिशेनं जात होती. याआधी अमेरिकन युरोपियन कमांडनं बुधवारी व्हेनेझुएलाच्या तेल व्यापाराशी संबंधित रशियन टँकर मरीनेरावर अमेरिकेनं सैन्य आणि तटरक्षक दलानं संयुक्त ऑपरेशन करत आपल्या ताब्यात घेतल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. निर्बंधांचं उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली, फेडरल कोर्टाच्या वॉरंटवरुन ही कारवाई करण्यात आली. अटलांटिक महासागरात अमेरिकेच्या नौदलानं रशियाच्या तेल टँकरवर कब्जा मिळवला. विशेष म्हणजे यावेळी रशिय नौदलाची एक पाणबुडी आणि अनेक युद्धनौका तैनात होत्या. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी रॉयटर्सला दिलेल्या माहितीनुसार, रशियन टँकर पकडण्याचे प्रयत्न एका रात्रीत यशस्वी ठरलेले नाहीत. गेल्या अनेक आठवड्यांपासून अटलांटिक महासागरात या टँकरवर लक्ष ठेवलं जात होतं. हा टँकर आधी अमेरिकेच्या नाकाबंदीला गुंगारा देऊन निघून गेला होता. अमेरिकन तटरक्षक दलाच्या सूचना टँकरनं वारंवार धुडकावल्या. पकडल्या जाण्याच्या भीतीनं या टँकरनं भरसमुद्रात स्वतःची ओळख लपवण्यासाठी झेंडा आणि नोंदणीदेखील बदलली.

# मराठी भाषा-साहित्याच्या जतनासाठी आयुष्य वाहणारे अवलिया व्यक्तिमत्त्व : परमेश्वर उमरदंड सर

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती जतन-संवर्धनासाठी निःस्वार्थपणे झटणारी काही मोजकीच माणसे असतात. अशाच दुर्मीळ, कर्तृत्ववान आणि कृतीशील व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे परमेश्वर उमरदंड सर. मराठीबोली पुणे या संस्थेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून पुणे व राज्यभर मराठी भाषेच्या प्रसारासाठी ते अविरत कार्यरत आहेत.

संस्थापक समाजऋषी काशिनाथप्पा उमरदंड यांच्या प्रेरणेने आणि युगप्रवर्तक जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानून, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या विशाल कर्तव्यभावनेतून प्रेरणा घेत उमरदंड सरांनी आपले संपूर्ण आयुष्य मराठी भाषेच्या सेवेस अर्पण केले आहे. राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा, काव्यवाचन, काव्यलेखन स्पर्धा अशा विविध उपक्रमांतून नवोदित लेखक, कवी आणि साहित्यिकांना त्यांनी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

नम्र, मनमिळाऊ, शांत स्वभावाचे उमरदंड सर म्हणजे प्रत्यक्षात पडद्याआड राहून काम करणारे नेतृत्व. मराठीबोली संस्थेचे प्रमुख असताना कधीही मोठेपणा न मिरवता, नेहमी इतरांना मान-सन्मान देताना ते दिसतात. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वतः पुढाकार घेऊन प्रत्येक कामात झटणारे हे व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी आदर्श ठरते.



गेल्या चार वर्षांपासून त्यांच्याशी जवळून परिचय असून, प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा निस्वार्थ भाव, प्रामाणिकपणा आणि सेवावृत्ती अनुभवायला मिळाली आहे. विशेष म्हणजे, कार्यक्रमांसाठी राजकीय व्यक्तींना प्राधान्य न देता, साहित्य क्षेत्रातील प्रेरणादायी आणि कर्तृत्ववान व्यक्तींना ते सन्मानपूर्वक आमंत्रित करतात. त्यामुळेच मराठीबोलीचे कार्यक्रम म्हणजे साहित्यिकांसाठी प्रेरणेचे केंद्र ठरले आहेत.

मराठीबोलीच्या दिवाळी अंकात कोणत्याही प्रकारच्या जाहिराती नसतात; केवळ साहित्याला महत्त्व देऊन नवोदित व मान्यवर लेखकांना मुक्त व्यासपीठ दिले जाते. मराठी भाषा आणि साहित्यिकांचे कौतुक व सन्मान करणारी, अशा शुद्ध हेतूने कार्य करणारी मराठीबोली पुणे ही संस्था आज एकमेव ठरावी, इतके तिचे कार्य मोलाचे आहे.

दरवर्षी आर्थिक मदतीशिवाय एवढ्या मोठ्या स्तरावर कार्यक्रम यशस्वीपणे राबवणे हे सोपे काम नाही. मात्र, उमरदंड सरांच्या प्रामाणिक व निस्वार्थ हेतूमुळे अनेक हात आपोआप जोडले जातात, अनेक मने त्यांच्याशी बांधली जातात. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

अशा मराठी भाषेच्या सेवेस वाहिलेल्या अवलिया व्यक्तिमत्त्वाबद्दल कितीही लिहिले तरी ते कमीच आहे. तरीही मनातील भावना शब्दांत मांडण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

मराठीबोली पुणे आणि परमेश्वर उमरदंड सर यांना मनापासून शुभेच्छा

मराठी भाषा अशीच समृद्ध होत राहो, आणि तुमचे कार्य अधिकाधिक उंचीवर पोहोचो, हीच सदिच्छा.

**– धोंडपा नंदे (संपादक, गावगाथा दिवाळी अंक)**

## पत्रकार आपल्या लेखणीतून लोकशाही बळकट करण्यासाठी व समाजाचे प्रश्न मांडण्याचे कार्य करतात : गटविकास अधिकारी सोपान अकेले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी) : पत्रकार आपल्या लेखणीच्या माध्यमातून राष्ट्र ,समाज व लोकशाही बळकट करण्यासाठी कार्य करत असतात त्यांचे योगदान मोठे आहे. शासनाच्या विविध योजना लाभार्थ्या पर्यंत पोहोचवण्यासाठी पत्रकारांचे सहकार्य मिळते. असे विचार कळंब पंचायत समिती गटविकास अधिकारी सोपान अकेले यांनी कळंब पंचायत समिती कार्यालय येथे दि. ६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार दिन कार्यक्रमात बोलत असताना व्यक्त केले. या प्रसंगी उपस्थित पत्रकारांचा डायरी,पेन, व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सहाय्यक गटविकास अधिकारी मनीषा सुकाळे, विस्तार अधिकारी हनुमंत झांबरे, दत्तात्रय साळुंखे, आरोग्य विभाग अधिकारी बाबुराव जाधव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात संपादक लक्ष्मण शिंदे यांनी ग्रामीण भागातील पत्रकार सामाजिक बांधिलकीतुन लेखन करतातात बातमीमुळे अनेक वंचित घटकांना न्याय मिळतो असे सांगितले. तर ज्येष्ठ पत्रकार बालाजी अडसूळ यांनी चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्याचे काम करीत असताना कामातील उनिवा दाखविण्याचे काम देखील पत्रकार करतात. काही प्रसंगी त्यांना यामुळे विरोध स्वीकारावा लागतो असे सांगितले. तर ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन कार्याविषयी व दर्पण नियतकालिका विषयी विचार व्यक्त केले. हनुमंत पाटुळे यांनी पत्रकार क्षेत्रातील समस्या मांडल्या या प्रसंगी गौर येथील माजी पंचायत समिती सदस्य माने बाप्पा, सहाय्यक गट विस्तार अधिकारी मनीषा सुकाळे यांनी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात व्हाईस ऑफ मिडिया महाराष्ट्र प्रदेश शिक्षण विभाग प्रमुख चेतन कात्रे, बालाजी बाप्पा आडसूळ, लक्ष्मण शिंदे, समीर मुल्ला, माधवसिंग राजपूत, हनुमंत पाटुळे, राम रतन कांबळे,रसूल तांबोळी, बाबुराव पौळ, प्रवीण कसबे आदींचा पत्रकार दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विस्तार अधिकारी श्री झांबरे यांनी मानले.



# 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी: ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष आणि राज्यव्यापी सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. श्री गुरु तेग बहादूर हे शीख धर्माचे ९ वे गुरू होते, त्यांना हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेग बहादूर यांनी शीख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा गुरु ग्रंथ साहिब यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादूर यांनी १७ व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. मुघल सम्राटांच्या विरोधात जावून भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

श्री गुरु तेग बहादूर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समिती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. त्यानुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ जून २०२५ रोजी हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समितीची याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता, राज्यस्तरीय समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समिती व विविध कार्यक्रम आयोजन व्यवस्था समिती इ. समित्या दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आल्या आहेत. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण व त्यात समाविष्ट असलेले जिल्हे :-

नांदेड - छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे, जळगाव

नागपूर - वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, नवी मुंबई - मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नांदेड, नागपूर व नवी मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता आवश्यक शिफारशी करण्यासाठी नांदेड, नागपूर व नवी मुंबई जि. ठाणे या तीन ठिकाणी क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. क्षेत्रीय आयोजन समितीची कार्यकक्षा :- नवी मुंबई, जि. ठाणे या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करून त्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती राज्यस्तरीय समितीस व अल्पसंख्याक विकास विभागास सादर करणे.

या कार्यक्रमाचे योग्य नियोजन, परिणामकारक अंमलबजावणी याकरिता आयोजन समन्वय समिती, व्हीआयपी व्यवस्थापन समिती, सभागृह व्यवस्थापन समिती, प्रशासन व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समिती, मंडप व्यवस्थापन समिती, बैठक व स्वागत व्यवस्थापन समिती, अतिथी व्यवस्थापन समिती, निवास व्यवस्थापन समिती, नाव नोंदणी व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी व्यवस्थापन समिती, प्रचार व प्रसार व्यवस्थापन समिती, दक्षता व्यवस्थापन समिती, महिला सुरक्षा व्यवस्थापन समिती, आपात्कालीन व्यवस्थापन समिती, पाणीपुरवठा व्यवस्थापन समिती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, स्वरुपा व्यवस्थापन समिती, सार्वजनिक परिवहन व्यवस्थापन समिती, जूताघर व्यवस्थापन समिती, लंगर व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यकता असलेल्या समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या .ारहरीरीहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१०१८५९४२७८१४ असा आहे. तरी या सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**– मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

**पत्रकारांनी आपल्या संघटनेशी एकनिष्ठ राहावे : भगवान चंदे**

**बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन साजरा**

# आमचा पत्रकार घेणारा नाही तर देणारा आहे : विश्वासराव आरोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने ५ जानेवारी २०२६ रोजी शहापूर तालुक्यातील दहागाव येथील घोडविंदे फार्म हाऊस येथे बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन पत्रकारांचा सत्कार व सामाजिक बांधिलकीने साजरा करण्यात आला. तर शब्दशक्ती २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष भगवान चंदे शहापूर उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे ,वासिंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हुनदेलकर प्रमुख म्हणून उपस्थित होते.तर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ठाणे जिल्हा शाखेकडून जिल्हा परिषद दहागाव शाळेतील विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव यांनी कविता सादर केल्या. तर यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शहापूर तालुका अध्यक्षपदी संजय भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.









आमच्या पत्रकार संघातील प्रत्येक पदाधिकारी ,पत्रकार

प्रामाणिकपणे काम करीत असतो. पत्रकार घेणारा नाही तर इतरांना मदत करणारा असतो. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मंबई संलग्न,ठाणे जिल्हा शाखा नेहमी आदर्श ठरली आहे. असे यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी बोलतांना सांगितले.

पत्रकार समाजाचा आरसा आहे. तर पत्रकारांनी आपल्या संघटनेशी एकनिष्ठ राहावे. असे यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे यांनी बोलतांना सांगितले.

पत्रकारांची आणि आमची ड्युटी सारखीच असते.त्याचे काम बातमीचा मागोवा घेणे आणि छापणे हे त्यांचे कर्तव्य आहे तसेच घटनास्थळी जाऊन पंचनामा करणे,गुन्हा नोंदविणे आणि आरोपीचा शोध घेणे हे आमचे काम आहे.अश्यावेळी कधीकधी शाब्दिक संघर्ष होत असतो.परंतु ते तात्पुरते असते.शोध पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. असे प्रतिपादन पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी भगवान चंदे यासोबतच संतोष गायकर,संजय भोईर, संजय भालेराव, मिलिंद जाधव, वसंत पानसरे, मेघनाथ विशे, नितीन पंडित,योगेश गोडे, शेखर भोईर, अनिल पाटील ,गीता गायकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा सहपत्नीक तर पत्रकारांचा

सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नंदकुमार मगरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाशिंद शहर अध्यक्ष संदीप पाटील, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, डॉ . रुपाली शेडगे,

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके यांनी केले तर आभार मिलिंद जाधव यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ज्योतिबा पारखे यांचे कार्य कौतुकास्पद : कमलाकर सोनकांबळे

## ज्योतिबा पारखे व पारखे परिवाराकडून पत्रकारांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तथा पत्रकार दिनानिमित्त समाजसेवक ज्योतिबा पारखे व पारखे परिवाराकडून अक्कलकोट शहर व तालुक्यातील पत्रकारांचा शाल,गुलाब पुष्प व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

पत्रकारांचा गौरव करणारा नसून लोकशाहीचा कणा असलेल्या पत्रकारितेच्या दीर्घ संघर्षमय आणि प्रेरणादायी इतिहासाची आठवण करून देणारा हा सत्कार आहे.पत्रकार सर्वांगीण विकासाला चालना देणारा आरसा असुन पत्रकार केवळ माहिती देणारी न राहता समाज जागृती व अन्यायाविरुद्ध लढा देणारा असवा असे ज्योतिबा पारखे यांनी व्यक्त केले.



यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, सचिव विश्वनाथ चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार चेतन जाधव, ज्येष्ठ पत्रकार महेश गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार राजेश जगताप, शिवा याळवार, नंदकुमार जगदाळे स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारी, अजित राठोड, सिद्धू पुजारी, सिद्धार्थ भडकुंबे,समाधान आहिरे यांच्यासह आदी पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.



निःस्वार्थपणे समाजासाठी झटणे, गरजू आणि वंचित घटकांना मदत करणे, सामाजिक समस्यांवर आवाज उठवणे, आणि इतरांना प्रेरणा देऊन समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे कार्य ज्योतिबा पारखे यांनी केले आहे. सामाजिक कार्य करताना कोणतीही अपेक्षा न ठेवता मिळालेले समाधान अधिक महत्त्वाचे असते असे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कमलाकर सोनकांबळे यांनी बोलताना ज्योतिबा पारखे यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी सामाजिक ज्योतिबा पारखे, सोहेल फरास, बसराज अळ्ळोळी,समाजसेवक शांम बाबर, किरण पारखे, अशरफअली गोलंदाज, श्याम बाबर आदी उपस्थित होते.



# पंढरपूर लोकमंगल पतसंस्थेच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकारांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर लोकमंगल पतसंस्थेच्या वतीने पत्रकारांचा येतोचित सन्मान करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी देखील परंपरा कायम ठेवत मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने पंढरपूर शहर व तालुक्यातील पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी दिनांक ६/१/२०२६ रोजी पंढरपूर लोकमंगल पतसंस्था शाखा क्रमांक यांच्यातर्फे मराठी पत्रकार दिनात साजरा करण्यात आला.

यावेळी मा श्री राजेंद्र कोरके पाटील, श्री शंकर कदम, श्री रोहन नरसाळे, श्री कुमार कोरे, संतोष मोरे, अतुल मोरे, संतोष रणदिवे, अपराजित सर्वगोड, हरी प्रक्षाळे, रवी कोळी, श्रीकांत कसबे, महेश कदम, विक्रम कदम, बाळासाहेब काशीद, गणेश पवार, रामदास नाट्य, यावेळी सर्व पत्रकारांना बांधवांचा यथोचित सन्मान करण्यात आला संस्थेचा अहवाल, कॅलेंडर, फाईल पेन संस्था माहितीपत्रक श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी संस्थेचे सल्लागार सुभाष खटावकर, कल्याणराव कोले, वसंतराव चोले, व शाखा अधिकारी श्री बापू कारंडे, व संस्थेचा स्टाफ उपस्थित होते.

# करमाळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मोहिनीताई सावंत यांनी पदभार स्वीकारला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी




करमाळा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक निकाल २१ डिसेंबर रोजी लागला असून १५ दिवस उठूनही नगराध्यक्ष व नगरसेवकांनी आपला पदभार देण्यात आला नव्हता परंतु बुधवारी ७ जानेवारी रोजी नगराध्यक्ष मोहिनीताई सावंत यांनी मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्याकडून नगरपरिषदेचा पदभार घेतला आहे. करमाळा शहर विकासासाठी यांचा नगराध्यक्ष व आठ नगरसेवक व भाजपचे सात नगरसेवक तर शिवसेनेचे पाच नगरसेवक वाचल्याने त्रिशंकू स्थिती निर्माण झाली आहे.

नगराध्यक्ष मोहिनीताई सावंत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी बोलताना सांगितले की करमाळा शहराच्या विकासासाठी मी कटिबद्ध असून शहरवासीयांनी दिलेल्या अहमदपूर व यशामुळेच मी नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले आहे मी शहरातील नागरिकांच्या प्रत्येक समस्या सोडवणार असून भविष्यात चांगले कामकाज करून करमाळा नगरपालिकेचे नाव संपूर्ण राज्यात पोहोचवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करेल असे बोलताना नगराध्यक्ष मोहिनीताई सावंत म्हणाल्या यावेळी नगरसेवक संजय सावंत, व सावंत गटाचे युवानेते पैलवान सुनील बापू सावंत, पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच हमाल पंचायतीचे अध्यक्ष अँड राहुल सावंत, गणेश सावंत व सावंत गटाची असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंधरा वर्षाची प्रतीक्षा संपली: माळकवटे शेतकऱ्यांचा रस्ता तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली झाला मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूपच्या अप्पर तहसील कार्यालय परिसरातील माळकवटी येथील सुमारे पंधरा वर्षापासून चा प्रलंबित रस्ता केला मोकळा करण्यात आला आहे.



याबाबत अशी माहिती की तहसीलदार दक्षिण सोलापूर यांच्याकडील आदेश क्रमांक जमा १/एस आर/४६/१० दिनांक १६/४/२०१० अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अनुसार नवीन रस्ता मंजूर करण्यात आला होता. तथापि मंजूर रस्त्याच्या ठिकाणी बांध, काटेरी झाडे धुडपे शेतकऱ्याचे बांध असे अनेक अडचणीमुळे तसेच शेतकऱ्यातील आपापसातील वाद व हद्दी खुणा निश्चित नसल्याने रस्ता खुला करण्यासाठी मागील पंधरा वर्षापासून प्रलंबित होता त्यामुळे शेतकऱ्यांना त्याची ऊस व कारखान्यात घ** शेतीसाठी जे काम करणे वस्तीवरील मुलांना शाळेत जाणे येण्यासाठी खूप त्रास होत होते व अनेक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता सध्या ऊस तोडणी व शेतीचे कामे सुरू असल्याने मंद्रूप अप्पर तहसीलदार विष्णू बुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी राहणार वाघमारे व ग्राम महसूल अधिकारी गणेश भुजबळ यांनी संबंधित शेतकऱ्यांचे मन परिवर्तन करत रस्त्याचे महत्त्व पटवून देऊन तीन किमी चा अवघड रस्ता खुला करून देण्यात आला. यामुळे मौजे माळकवटी तालुका दक्षिण सोलापूर येथील ७० ते ८० शेतकऱ्यांना फायदा झाला असून शेतकरी व ग्रामस्थांनी महसूल प्रशासनाची आभार मानले आहे.

**सर्व शेतकऱ्यांच्या संमतीने शिवारातून शेतीमालाची किंवा शेती अवजारांना ज्ञान करण्यासाठी निर्माण करण्यात आलेले कच्ची रस्ते अथवा पानंद रस्ते जाणून बुजून अडवली जात आहेत परिणामी ऊस वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणीचा सामना करावा लागत असल्याने हे आडवलेले रस्ते महसूल प्रशासन मोकळे करण्याची मोहीमाती घेतली आहे. त्यानुसार मावळ कोटी येथील शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना रस्त्याच्या ताबा दिला आहे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्याकडून करणारे शेतकऱ्यांच्या वर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येईल.**

**– विष्णू बुटे अप्पर तहसीलदार, बुद्रुक,**

# वागदरीत जि.प.शाळेस डायस, स्पिकरमाईक, घड्याळ, माईक स्टॅन्ड व फुलदानी भेट देवून मिटकर कुटूंबानी केला मुलाचा वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी एस.के. गायकवाड : मुलाचा वाढदिवस म्हटले की मित्राला पार्टी वगैरे देऊन केक कापून प्रसंगी महागडा डीजे लावून वाढदिवस साजरा केला जातो.परंतु असा कसलाही डामडौल न करता वागदरी ता.तुळजापूर येथील सुज्ञ मिटकर कुटुंबीयांनी आपल्या मुलाचा वाढदिवस येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस स्पीकरमाईक,डायस,घड्याळ, माईकस्टॅन्ड व फुलदाणी भेट देऊन आपल्या मुलाचा वाढदिवस कुटुंबासह शाळेत साजरा करून एक नवीन आदर्श समाजापुढे ठेवला आहे.




दि.०५ जानेवारी २२५ रोजी वागदरी ता.तुळजापूर येथिल सौ.संपदा सचिन मिटकर व डॉ.सचिन गणपतराव मिटकर यांचे चिरंजीव ब्रम्हांड सचिन मिटकर यांचा वाढदिवसहोता. आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त येथिल जि.प. शाळेसाठी डायस,घड्याळ, माईक व माईक स्टॅन्ड फुलदाणी या वस्तू भेट देवून चिरंजीव ब्रम्हांडचा वाढदिवस आजी आजोबा,आई वडिल काका सह संपूर्ण कुटूंबासमवेत शालेय विद्यार्थ्या सोबत साजरा केला. या वेळी गावातील गणपतराव मिटकर,विश्वनाथ मिटकर,रविकांत यादव,नितीन यादव,प्रशांत जाधव,ऋषिकेश सुरवसे,तुकाराम लकडे, किशोर पाटील, सौ.पार्वती बिराजदार, श्रीमती सुषमा मसे मॅडम सौ पद्मीनबाई पवार अंगणवाडी सेविका सौ रूपाली मिटकर अंगणवाडी मदतनीस,नरसूपंत काळे सर,धनाजी अनपट सर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या प्ररुंगी मुख्याध्यापक भरत सगर सर ,डॉ सचिन मिटकर सर ,श्रीमती सुषमा मसे मॅडम रविकांत यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावातील सर्वांनी असेच पुढे येऊन शाळेसाठी मदत करावे असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक भरत सगर सर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजीलोहार सर यांनी केले.

# डॉक्टरांनी रुग्णासोबतच सामाजिक विषमतेचेही निदान केले पाहिजे : सागर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने भेकराई नगर मधील भुजबळ हॉस्पिटलच्या वतीने महिलांचा सन्मान करण्यात आला. भुजबळ हॉस्पिटल परिवाराच्या वतीने महिला सक्षमीकरण झाले पाहिजे, महिला आणि पुरुष समान पातळीवरती आली पाहिजे हा उद्देश डोक्यामध्ये ठेवून आज सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने महिला मुक्ती दिनी औचित्य साधून डॉ. महिलांचा सन्मान व नवनिर्वाचित नगरसेविका यांच्या सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याता म्हणून उपस्थित



राहून मा. सागर सोनकांबळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विचार आणि कार्यावरती डॉक्टरांशी संवाद साधला. यावेळी सागर सोनकांबळे म्हणाले की, डॉक्टरांनी रुग्णासमवेत सामाजिक विषमतेचे देखील निदान करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या कार्यक्रमाचे भव्य आयोजन हॉस्पिटलचे प्रमूख हरिषचंद्र भुजबळ यांच्या वतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमूख उपस्थिती नगरसेविका उषाताई ढोरे, स्नेहलता जवंजाळ, स्नेहल हरपळे, सुकन्या शेवाळे, सुधाताई हारपाळे,डॉ.अभिष भुजबळ,पार्था भुजबळ, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन लांडगे, कार्यक्रमाचे आभार अनुजा भुजबळ यांनी केले

**कर्मवीर गणपत दादा मोरे राष्ट्रीय व्याख्यानमालेचा समारोप**

**प्रा.डॉ.देवरे यांचे प्रतिपादन**

# भारतीय लोकशाही केवळ शासनपद्धती नसून ती जीवनमूल्ये



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारतीय लोकशाहीचा विकास हा एक दीर्घ, बहुआयामी आणि ऐतिहासिक प्रवास आहे. प्राचीन काळातील लोकसहभागी परंपरेपासून ते आधुनिक संविधानात्मक लोकशाहीपर्यंत भारताने लोकशाहीची एक समृद्ध वाटचाल केली आहे.भारतीय लोकशाही केवळ शासनपद्धती नसून ती जीवनमूल्ये, स्वातंत्र्य, समानता व न्याय यांचे प्रतीक आहे. जनता निवडणुकांद्वारे आपले प्रतिनिधी निवडते व शासनावर नियंत्रण ठेवते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानतेचा हक्क, धर्मस्वातंत्र्य इत्यादी मूलभूत हक्क लोकशाहीमुळे नागरिकांना मिळतात.जात, धर्म, लिंग, भाषा यावर आधारित भेदभाव न करता सर्वांना समान संधी देण्याचा प्रयत्न लोकशाही करते. स्थानिक स्वराज्य संस्थांमुळे जनतेचा थेट सहभाग वाढतो. असे मत ज्येष्ठ राजकीय विचारवंत प्राचार्य डॉ पी.डी. देवरे यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दूरस्थ माध्यमातून आयोजित दहा दिवसीय राष्ट्रीय व्याख्यानमाला समारोप प्रसंगी 'भारतीय लोकशाहीचा विकास' ह्या विषयावर ते बोलत होते.

यावेळी मविप्र शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. नितीन जाधव, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. संजय वाघ (कल्याण ), प्राचार्या डॉ. कल्पना आहिरे, प्रा.डॉ. लियाकत खान(मुंबई ), प्राचार्य डॉ राजधर टेमकर, प्रा. डॉ. सुनील नेवे, प्रा. डॉ. विजय सूर्यवंशी,प्रा डॉ संजय मराठे, प्रा डॉ प्रशांत देशपांडे आदि उपस्थित होते.




प्राचार्य डॉ पी डी देवरे पुढे म्हणाले कि, भारतीय लोकशाहीचा विकास हा संघर्ष, सुधारणा आणि सहभाग यांचा संगम आहे. विविधतेत एकता, संविधानात्मक मूल्ये आणि लोकांचा सक्रिय सहभाग यांमुळे भारतीय लोकशाही आजही गतिमान व सशक्त आहे. जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण, भ्रष्टाचार, आर्थिक विषमता, राजकीय गुन्हेगारीकरण, दुर्बल विरोधी पक्ष, सत्ताकेंद्री राजकारण ही काही भारतीय लोकशाही पुढील आव्हाने आपण दूर करणे आवश्यक आहे. असे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी युवकांनी लोकशाही बळकट करण्यासाठी विचार्पूवक मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन केले.


दहा दिवशीय व्याख्यानमालेत दिनांक २४ डिसेंबर पासून राज्यशास्त्रविषय तज्ञांनी विविध विषयांवर आपले विचार व्यक्त केले. यात मविप्र शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. नितीन जाधव,प्रा डॉ रोहिदास मुंढे(मुंबई ), प्रा, डॉ, हिमांशू यादव (प्रयागराज),प्रा, डॉ, हरी राम (गौंडा,उतरप्रदेश ), महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय वाघ, प्रा. डॉ. मनीष सोनवणे, प्रा. डॉ. शेखर आष्टीकर(नवी दिल्ली), प्रा. डॉ. संभाजी पाटील यांचा समावेश होता. व्याख्यानमालेचे संयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी केले तर व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. सुसान लॉवरेन्सिया, प्रा योगेश कडलग, प्रा. श्रद्धा गवळी, प्रा ज्ञानेश्वर मोगल, प्रा. डॉ. महेश बनकर, प्रा. डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. डॉ. रोहिदास शिंदे, प्रा.चित्रा कापसे, प्रा.डॉ.सुरेखा जाधव यांनी मेहनत घेतली .

# प्रचारासाठी एकत्र आले आ. विजयकुमार देशमुख आणि आ. देवेंद्र कोठे

## प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपाच्या पदयात्रेत उसळली हजारोंची गर्दी; औक्षण आणि पुष्पवृष्टीने झाले उमेदवारांचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ढोल ताशांचा गजर, आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांची एकत्र प्रमुख उपस्थिती आणि जागोजागी नागरिकांनी औक्षण, पुष्पवृष्टी करत उमेदवारांचे केलेले स्वागत अशा उत्साही वातावरणात प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपाच्या पदयात्रेत बुधवारी हजारोंची गर्दी उसळली. आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह दिग्गजांच्या उपस्थितीमुळे भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांसह मतदारांमध्येही प्रचंड उत्साह दिसून आला.



चौत्रा पुणे नाका मंडळ गणपती बाप्पाच्या मूर्तीच्या तसेच धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या मूर्तीच्या पूजनाने पदयात्रेचा प्रारंभ झाला. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, पुरुषोत्तम बरडे, प्रभाग ७ चे निवडणूक प्रमुख श्रीकांत घाडगे, उमेदवार आनंद कोलारकर, पद्माकर काळे, उत्तरा बरडे - बचुटे, श्रद्धा पवार, भाजपच्या सरचिटणीस सुद्धा अळीमोरे, सतीश कुदळे, किरण पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, प्रभाग क्रमांक सात मध्ये आमदार विजयकुमार देशमुख, मी स्वतः, ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम बरडे, पद्माकर काळे आणि प्रभागात राहणारे सर्व दिग्गज नेते एकत्र आले आहेत. प्रभाग क्रमांक ७ मध्ये निघालेली भव्य पदयात्रा ही या प्रभागातील भाजपच्या विजयाची नांदी आहे. २०१२ सालापासून १० वर्षे या प्रभागाने मला नागरिकांची सेवा करण्याची संधी दिली आहे. त्याच जोरावर मी प्रभागासह शहरात विविध ठिकाणी विकास करू शकलो. प्रभाग क्रमांक ७ हे माझे कुटुंब आहे. नगरसेवक असताना या प्रभागासाठी भरघोस निधी आणण्याचा मी यशस्वी प्रयत्न केला आहे. सध्या शहरात भारतीय जनता पार्टीचे तीन आमदार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सोलापूर शहराला भक्कम पाठबळ आहे. या जोरावर प्रभाग क्रमांक ७ सह शहरासाठी भरघोस निधी आणून शहराचा कायापालट करण्यासाठी भाजपा सज्ज आहे, असेही आमदार देवेंद्र कोठे म्हणाले.

पारंपारिक ढोल ताशे, हलग्यांचा कडकडाट, हाती भाजपाचे झेंडे, गळ्यात भाजपाचे शेले, 'भारतमाता की जय', 'जय श्रीराम', 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' च्या घोषणांमुळे प्रभाग क्रमांक ७ परिसर भाजपमय झाल्याचे चित्र पहायला मिळाले. यावेळी कार्यकर्त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या छबी असलेले फलक धरले होते.

हजारोंच्या गर्दीत जुना पुणे नाका येथून सुरुवात झालेली ही पदयात्रा हांडे प्लॉट, अवंती नगर, रो हाऊस भाग एक, भाग दोन, थोबडे नगर, निराळे वस्ती, जुनी पोलीस लाईन, दूध पंढरी परिसर मार्गे राघवेंद्र मठ परिसरात विसर्जित झाली.

भाजप उमेदवारांच्या पदयात्रेचे प्रभाग क्रमांक ७ मधील मतदारांनी जागोजागी उत्स्फूर्त स्वागत केले. नागरिकांनी घरासमोर कमळ चिन्हाच्या रांगोळ्या तसेच फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या. उमेदवारांचे औक्षण करत पुष्पवृष्टी करून आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे आणि उमेदवारांचे स्वागत करण्यात आले. बुधवारी प्रभाग क्रमांक ७ मध्ये झालेली भाजपाची प्रचंड मोठी पदयात्रा विरोधकांना धडकी भरवणारी असून ही भाजपाच्या प्रभाग क्रमांक ७ मधील विजयाची नांदी आहे, असे मतदारांनी सांगितले.

# 'अविष्कार २०२५' मध्ये स्वेरीला घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ स्तरीय 'अविष्कार २०२५' या संशोधन महोत्सवात उल्लेखनीय असे यश संपादन करून राज्यात स्वेरी महाविद्यालयाचा नावलौकिक आणखी वाढविला आहे. या निमित्ताने महाविद्यालयातील तब्बल पाच शोध प्रकल्पांची निवड 'राज्यस्तरीय अविष्कार २०२५' या स्पर्धेसाठी झाली आहे यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



दि. २९ व दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सोलापूरातील व्ही. जी. शिवदारे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये 'अविष्कार २०२५' ही स्पर्धा पार पडली. या संशोधन महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांतील ३९१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत पंढरपूरच्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये विशेष चमकदार कामगिरी केली. रुक्मांगत मुकुंद उत्पात यांनी पदवी स्तरावर असलेल्या 'ॲग्रीकल्चर अँड अनिमल हजबंडरी' या गटात प्रथम क्रमांक मिळविला. गिरिजादेवी संतोष देशमुख यांनी पदवी स्तरावर असलेल्या 'मेडिसिन अँड फार्मसी' या गटात तृतीय क्रमांक मिळवला तसेच श्रद्धा भगवान गव्हाणे, हनुमंत पोपट बोराटे आणि मिथुन धवल शहा यांनी पदव्युत्तर स्तरासाठी असलेल्या अनुक्रमे इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, पीएच. डी. स्तर- इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि प्युअर सायन्सेस या गटात द्वितीय क्रमांक मिळवला.

स्पर्धेच्या समारोप समारंभासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर तसेच बालाजी अमाईन्स लिमिटेड, सोलापूरचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या मान्यवरांकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले आणि त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली.

या सर्व विद्यार्थ्यांना पु.अ. हो. सोलापूर विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, स्वेरीतील संशोधन व विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. अभिषेक एम. एस. आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालय स्तरावर आविष्कार २०२५ चे समन्वयक म्हणून डॉ. दिग्विजय रोंगे आणि प्रा. दिगंबर काशीद यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी महत्त्वाची भूमिका बजावून योग्य मार्गदर्शन केले. निवड झालेले प्रकल्प आता जानेवारी २०२६ मध्ये परभणी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय 'अविष्कार २०२५' स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, संस्थेअंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्राध्यापक वर्ग, पालक, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन करून त्यांच्या संशोधन वृत्तीचे कौतुक केले आहे.

# हिरे महाविद्यालयात व्याख्यान यशस्वी संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/प्रतिनिधी

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, पंचवटी, नाशिक येथे इतिहास विभाग व Allumni Association यांच्या संयुक्त विद्यमाने Alumni Connect माजी विद्यार्थीचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्याता म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी कु. राणी गायकवाड यांनी पोलीस पाटील या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी पोलीस पाटील पदाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, ग्रामीण प्रशासनातील भूमिका तसेच कायदेशीर अधिकार याविषयी सखोल माहिती दिली. पोलीस पाटील हा गाव आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या व्याख्यानात केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. प्रमोद आंबेकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा उपक्रमांमुळे स्पर्धा परीक्षा तसेच ग्रामीण प्रशासनाची माहिती मिळण्यास मोठी मदत होते, असे सांगितले. यावेळी व्यासपीठावर इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रगती मारकवार, प्रा. गोरख शेवाळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना माजी विद्यार्थ्यांच्या अनुभवातून विद्यमान विद्यार्थ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गोरख शेवाळे यांनी केले. प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय प्रा. मधुरा देवकुटे यांनी करून दिला, तर आभार प्रा. महेश व्यवहारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. शिवम बच्छाव यांनी विशेष प्रयत्न घेतले. सुमारे ६० विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर: प्रतिनीधी, सुधाकर रणदिवे,रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या ही कार्यशाळा प्रा राधिका माने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.या वेळी रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य रतन लहाने यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती चे शिक्षक शिक्षण प्रशिक्षणात महत्व या विषयावर मार्गदर्शन केले.प्रा राधिका माने यांनी विविध शालेय विषयात शैक्षणिक साहित्य निर्मिती कशी करायची या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.या वेळी अनेक शैक्षणिक साहित्य,नमुने , प्रतिकृती तयार केल्या.या कार्यशाळेत बी एड, डी एल एड चे छात्र अध्यापक सहभागी झाले.कार्यशाळा यशस्वी करण्यास प्र प्राचार्य उमेश रणदिवे, प्रा रमाकांत गायकवाड, ग्रंथपाल मनिषा लातूरकर,अजय बद्दर, अभिषेक जाधव दत्ता चादरे यांनी सहकार्य केले.



# महालक्ष्मी यात्रा सारणी गावात मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील सारणी गावामध्ये महालक्ष्मी चे जागरण देवस्थान आहे त्या महालक्ष्मी यात्रा मंगळवार दिनांक ६/ १ २०२६ रोजी दिवा व पालखीचे भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली या यात्रेमध्ये मुख्य आकर्षण हे पोतराज व हलकी वाद्य व आराधी मंडळ यांचे सुंदर असे गीते व शोभेचे दारू (फटाके ) आतिषबाजी करण्यात आली



सर्व गावातील भाविक भक्त व परिसरातील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते या यात्रेत रात्री बारा वाजता दिव्याची व पालखीची भव्य मिरवणूक करण्यात आली व बुधवार दिनांक ७/ १/ २०२६ रोजी दुपारी दोन वाजता जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले. या यात्रेमुळे गावात उत्साहाचे वातावरण होते विशेष म्हणजे महालक्ष्मी देवी नवसाला पावणारी देवी आहे म्हणून प्रसिद्ध आहे. या यात्रेमध्ये किल्लारी पोलीस स्टेशनचे मोलाचे सहकारी लाभले या यात्रेमध्ये विशेष करून सारणी गावचे सरपंच तुकाराम वाघमारे उपसरपंच रतन तमसटे ग्रामपंचायत सदस्य विनोद जाधव पवन बिराजदार गुरुनाथ चौकशे रत्नदीप भालेराव राजू जाधव व माजी सैनिक नाना पाटील महादेव मेनकुदळे गोपाळ तमसटे गुराप्पा बिराजदार प्रशांत पाटील अनिल कदम धोंडीराम हवलदार सिद्धेश्वर पाटील सुरेश हवलदार राजू पाटील श्रीशैल पाटील शिवाजी यशवंते युवराज बिराजदार सतीश बिराजदार विजय बिराजदार माजी सरपंच राजेंद्र बिराजदार माजी सरपंच सुरेश बिराजदार आर्मी संभाजी यशवंते व गावातील तरुण मंडळाचे व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**ग्रामीण संस्कृतीचा वारसा अनुभवातून**

**आनंददायी उपक्रमातून विद्यार्थ्यांना कष्ट, स्वावलंबन व संस्कारांचा प्रत्यक्ष धडा**

# कुमार जीवन शिक्षण विद्यामंदिर सुळकुड मधील विद्यार्थ्यांनी अनुभवली भाकरी करण्याची कला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर प्रतिनिधी कागल : चुलीचा धूर, भाजणाऱ्या भाकरीचा दरवळ, पिठल्याची आपुलकी या साऱ्यांतून ग्रामीण संस्कृतीचा जिवंत अनुभव कुमार जीवन शिक्षण विद्यामंदिर, सुळकुड येथील विद्यार्थ्यांना घेता आला. आनंददायी उपक्रमांतर्गत आयोजित चुलीवरच्या भाकरी या अनुभवसमृद्ध व संस्कारक्षम उपक्रमाने शाळेच्या अंगणातच ग्रामीण जीवनाची शाळा भरवली.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः चुल पेटवली, कणिक मळली, भाकरी थापल्या, पिठलं शिजवलं. हा उपक्रम केवळ स्वयंपाक शिकवणारा न राहता, कष्ट, संयम, जबाबदारी, सहकार्य आणि स्वावलंबन यांचा प्रत्यक्ष जीवनपाठ ठरला. चुलीच्या उष्णतेची झळ, भाकरी उलटवताना लागणारी एकाग्रता आणि एकमेकांना मदतीचा हात-या अनुभवातून श्रमाचे मोल विद्यार्थ्यांना मनापासून उमगले.

पाठ्यपुस्तकांपलीकडील हे शिक्षण विद्यार्थ्यांच्या मनावर ठसा उमटवणारे ठरले. विद्यार्थ्यांनी प्रेमाने तयार केलेली भाकरी व पिठलं शिक्षकांनी उभं राहून आस्वाद घेतला. हा क्षण केवळ भोजनाचा नसून माया, कृतज्ञता आणि शिक्षक-विद्यार्थी नात्यांचा जिव्हाळा अधोरेखित करणारा ठरला. शिक्षकांच्या चेहऱ्यावरचा अभिमान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी होता.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता वाजंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. विद्यार्थी प्रत्येक बाबतीत स्वावलंबी झाला पाहिजे या विचारातून शिक्षकांनी दैनंदिन जीवनातील कामांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर मांडले. कर्म हेच खरे देव हा मूल्यपाठ विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर रुजवण्यात आला.

या उपक्रमातून कुमार जीवन शिक्षण विद्यामंदिर, सुळकुड ही केवळ शैक्षणिक ज्ञान देणारी नव्हे, तर जीवन घडवणारी शाळा असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांनी भाकरी बनवायला शिकलीच; पण त्याहीपेक्षा माणुसकी, कष्टाची किंमत, स्वावलंबन आणि संस्कार आत्मसात केले-हा अनुभव आयुष्यभर दरवळत राहणारा ठरला.

या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, श्रमाचे महत्त्व उमगले आणि शिक्षक-विद्यार्थी नाते अधिक दृढ झाले. पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमींनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता वाजंत्री मॅडम, इयत्ता सातवीचे वर्गशिक्षक श्री. महादेव शिरोळे सर, तसेच श्री. आण्णासो चव्हाण सर, श्री. पांडुरंग सनगर सर, श्रीमती उज्वला चौगुले मॅडम, श्री. मानतेश खोत सर यांनी विशेष परिश्रम घेतले. सौ. स्वाती पाटील मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

